# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## JNPAची जगातील टॉप-30 कंटेनर बंदरांमध्ये 21वे स्थान

नवी मुंबई : भारताच्या सागरी व्यापारासाठी महत्त्वाची असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीने (JNPA) जागतिक स्तरावर मोठी कामगिरी नोंदवली आहे. Alphalinerच्या २०२६च्या पहिल्या सहामाहीतील क्रमवारीनुसार JNPAने जगातील अव्वल ३० कंटेनर बंदरांमध्ये २१वे स्थान मिळवलं आहे. विशेष म्हणजे, २०२५मध्ये JNPA २८व्या क्रमांकावर होतं. त्यामुळे यंदा बंदराने तब्बल सात स्थानांची झेप घेतली आहे.

## कानपूरमध्ये प्रशिक्षण विमान शेतात कोसळले; दोघांचा अंत

**कानपूर :** उत्तर प्रदेशातील कानपूर (Kanpur) येथे एक अत्यंत दुःखद घटना घडली आहे. गुरुवारी गंगा नदीच्या किनाऱ्यावरील एका शेतात एक छोटे खाजगी प्रशिक्षण विमान अचानक कोसळले. या अपघातात विमानातील पायलट आणि सह-पायलट या दोघांचाही मृत्यू झाला आहे. विमान वाहतूक नियमाक संस्था (DGCA) या घटनेची चौकशी करत आहे. हे विमान कानपूरमधील 'गर्ग एव्हिएशन' या विमान प्रशिक्षण केंद्राचे होते.

## थोडक्यात वार्ता

### अमरावतीतील सर्व मोठ्या आस्थापनांचे फायर ऑडिट होणार

**मुंबई :** अमरावती जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परीक्षण (Fire Audit) आणि आग प्रतिबंधक सराव (Fire Drill) महिनाभरात पूर्ण करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले आहेत. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील (डफरीन) नवजात बालकांच्या मृत्यूच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर हे आदेश देण्यात आले आहेत. २४ ऑगस्ट रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास डफरीन रुग्णालयात ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पालकमंत्री बावनकुळे यांनी सकाळी चार वाजल्यापासून संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आवश्यक निर्देश दिले. मृत नवजात बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने ३६ नवजात बालकांना इतर रुग्णालयांमध्ये हलविण्यात आले. त्यापैकी २९ बालकांवर अमरावतीतील विविध रुग्णालयांमध्ये मोफत उपचार सुरू आहेत. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील ११, डॉ. मुरके रुग्णालयातील ८, होप रुग्णालयातील ८ आणि पारिजात रुग्णालयातील २ बालकांचा समावेश आहे. उर्वरित सात नवजात बालके त्यांच्या मातांसोबत डफरीन रुग्णालयात वैद्यकीय देखरेखीखाली सुरक्षित आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आरोग्यमंत्री आणि आरोग्य सचिवांनी घटनास्थळी पाहणी केली. त्यानंतर आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

### गंडक नदीची पाणीपातळी घटली; बिहारवरील पुराचा धोका टळला

नेपाळ आणि बिहारमधील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी आहे. गंडक म्हणजेच नारायणी नदीची पाणीपातळी वेगाने कमी होत असून, वाल्मिकीनगर गंडक बॅरेज येथे पाण्याचा प्रवाह सुमारे 81 हजार क्युसेकपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे बिहार आणि उत्तर प्रदेशच्या सीमावर्ती भागातील पुराचा संभाव्य धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात यापूर्वी अचानक आलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. तिबेट सीमेजवळ झालेल्या भूकंपानंतर पर्वत आणि बर्फाचा मोठा भाग नदीत कोसळल्याने नदीचा प्रवाह काही काळ अडवला गेला. त्यामुळे नैसर्गिक धरणासारखी स्थिती निर्माण झाली होती. पाण्याचा दबाव वाढल्यानंतर हे तात्पुरते अडथळे फुटल्याने नदीच्या वरच्या भागात अचानक पूर आला.

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन बिहार सरकार आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने गंडक नदीकाठच्या जिल्ह्यांना सतर्क केले होते. पश्चिम चंपारणसह संवेदनशील भागात बंधाऱ्यांवर देखरेख वाढवण्यात आली होती, तर मदत आणि बचाव पथकांनाही सज्ज ठेवण्यात आले होते.

### व्यायाम करताना अंकुश रावते यांचे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू



**कन्नड :** तालुक्यातील बहिरगाव येथील बळीराजा रोपवाटिकेचे मालक अंकुश कडुबा रावते यांचे गुरुवारी (दि. २७) सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. अवघ्या काही क्षणांत घडलेल्या या दुर्दैवी घटनेने रावते कुटुंबीयांसह बहिरगाव व कन्नड परिसरावर शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे, दररोजच्या दिनक्रमाप्रमाणे जिममध्ये व्यायाम करण्यासाठी गेलेल्या अंकुश यांच्यावर काळाने अचानक घाला घातला. अंकुश रावते हे दररोज आपल्या पुतणीला खासगी शिकवणीसाठी कन्नड शहरात आणून सोडत असत. पुतणीला शिकवणीला सोडल्यानंतर ते शहरातील खाजगी जिम येथे नियमितपणे व्यायाम करण्यासाठी जात होते.

### "शाल जोडे"




## "सण, उत्सव आहेत, गोरगरीब, हातावर पोट असलेल्या लोकांना त्रास देऊ नका" :सभापती अनिल मकरिये

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत सभापती अनिल मकरिये यांनी प्रशासनाला खडेबोल सुनावले आहेत. सण उत्सव असल्यामुळे शहरातील गोरगरीब आणि हातावर पोट असलेल्या व लहानाचे मोठे व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यांना किंवा सर्वसामान्यांचा रोजीरोटीचा प्रश्न असलेल्या घटकांना कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नका, अशी तडाखाबंद भूमिका त्यांनी घेतली आहे.

सभागृहात आयोजित एका महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान सभापती अनिल मकरिये यांनी प्रशासकीय अधिकारी व यंत्रणेला हे सक्त निर्देश दिले आहेत. शहरात प्रशासकीय कारवाई किंवा इतर मोहिमा राबवत असताना सणासुदीच्या दिवसांचे भान ठेवावे, असे त्यांनी स्पष्ट केले.



बैठकीत बोलताना सभापती अनिल मकरिये यांनी अत्यंत आक्रमक आणि संवेदनशील भूमिका मांडली. ते म्हणाले की, "सण, उत्सव आहेत, अशा वातावरणात गोरगरीब, कष्टकरी आणि हातावर पोट असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना प्रशासकीय कारवाईच्या नावाखाली किंवा अन्य कोणत्याही कारणावरून त्रास देऊ नका." सणाच्या दिवशी गरीबांचे व्यवसाय विस्कळीत झाल्यास त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवते, त्यामुळे यंत्रणेने अधिक संवेदनशीलतेने वागले पाहिजे, अशी ताकीद त्यांनी दिली.

या बैठकीत महापालिकेचे अधिकारी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभापतींच्या या सूचनेमुळे महापालिका प्रशासनाला सणासुदीच्या काळात सामान्यांवर कारवाई करताना आता अधिक काळजी घ्यावी लागणार असून, या भूमिकेचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

## भाजप पदाधिकाऱ्याकडून महिलेचा विनयभंग आरोपी मोकाट 'खाकी' वर्दीवर नेमका दबाव कुणाचा

### संतापाचा भडका गुंडगिरीला कंटाळून पीडित महिलेचा तहसीलसमोर आमरण उपोषणाचा थेट इशारा

**हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी**

**फर्दापूर :** एकीकडे राज्यात 'लेक लाडकी आणि बेटी बचाओ च्या मोठ्या गप्पा मारल्या जात असताना दुसरीकडे सत्तेच्या नशेत धुंद असलेल्या लोकप्रतिनिधींकडूनच महिलांच्या अब्रूचे धिंडवडे काढले जात असल्याचा अत्यंत संतापजनक आणि लज्जास्पद प्रकार सोयगाव तालुक्यातील वरखेडी तांडा येथे उघडकीस आला आहे महिला बचत गटाच्या एका प्रामाणिक सी आर पी महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग करणाऱ्या आरोपींना आठवडा उलटूनही सोयगाव पोलीस अटक करायला घाबरत आहेत का असा संतप्त सवाल आता जनता विचारू लागली आहे

घरात घुसून अब्रूवर घाला सत्तेची एवढी मस्ती आली कुठून

वरखेडी तांडा येथे राहणाऱ्या आणि स्वत च्या पायावर उभ्या असलेल्या २९ वर्षीय डाळीबाई राणीदास चव्हाण या दि. १८ जून २०२६ रोजी घरात एकट्या होत्या हीच संधी साधून मनोज राठोड राहुल राठोड आणि अमरसिंग राठोड या त्रिकुटाने त्यांच्या घरात बेकायदेशीरपणे घुसखोरी केली केवळ शिवीगाळ करून हे गुंड थांबले नाहीत तर त्यांनी महिलेशी अत्यंत लज्जास्पद वर्तन करत विनयभंग केला आणि थेट जीवे मारण्याची धमकी दिली सत्तेचा एवढा माज या आरोपींमध्ये आला कुठून हा खरा प्रश्न आहे

पोलिसांची बोटचेपी भूमिका आठवडा उलटला तरी आरोपी मोकाटच

या भयंकर प्रकणानंतर पीडितेने हिंमत दाखवत २० ऑगस्ट रोजी फर्दापूर पोलीस ठाण्यात एफ आय आर दाखल केला पण कायद्याचे रक्षक असलेल्या पोलिसांना जणू राजकीय लकवा मारला आहे आठवडा उलटला तरी आरोपींना साधी बेडी ठोकण्याची हिंमत पोलीस दाखवू शकलेले नाहीत हे मुजोर आरोपी आज गावात छाती फुगवून मोकाट फिरत आहेत आणि पीडितेलाच तक्रार मागे घे नाहीतर याद राख अशा धमक्या देत आहेत यामुळे पीडित महिला आणि तिचे कुटुंब सध्या दहशतीखाली जगत आहे

> रोखठोक सवाल भाजपच्या 'त्या' नेत्याला वाचवतंय तरी कोण

> या प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल राठोड हा भारतीय जनता पार्टीचा सोयगाव पंचायत समितीचा विद्यमान सदस्य आहे सत्तेच्या याच वळचणीला बसून तो कायद्याला वाकुल्या दाखवत आहे सत्ताधारी पक्षाचा नेता असल्यामुळेच पोलीस त्याच्यापुढे शेपूट घालत आहेत का असा थेट आरोप आता गावकरी करत आहेत एका महिलेच्या अब्रूपेक्षा पोलिसांना सत्ताधाऱ्यांची मर्जी राखणे जास्त महत्त्वाचे वाटते का

तर तहसील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण

या सर्व प्रकाराला कंटाळून आणि पोलिसांच्या निष्क्रियतेवर संतापून पीडित डाळीबाई चव्हाण यांनी आता थेट आरपारची लढाई पुकारली आहे येत्या ३ दिवसांत या मुजोर आरोपींना बेड्या ठोकल्या नाहीत आणि माझ्या कुटुंबाला संरक्षण दिले नाही तर सोयगाव तहसील कार्यालयासमोर आपण आमरण उपोषणाला बसू असा सज्जड दम त्यांनी तहसीलदार आणि पोलिसांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे

आता तरी पोलिसांची झोप उडणार का की एखाद्या महिलेचा बळी गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे

## गणेश मंडळांनी प्रसादाची शुद्धता जपावी : मुख्यमंत्री



मुंबई : महाराष्ट्राचा राज्य उत्सव असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सामध्ये मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या प्रसादासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांची माहिती करून घ्यावी. भाविकांना शुद्ध व भेसळमुक्त प्रसाद मिळण्यासाठी आवश्यक किमान निकषांचे पालन होण गरजेचे असून यासाठी मंडळांनी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सव-२०२६ निमित्त कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश दिले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतील गणेशोत्सव मंडळांनी उत्सवाला दिलेले व्यापक स्वरूप कौतुकास्पद आहे. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून मांडलेला सामाजिक अभिसरण आणि प्रबोधनाचा विचार राज्यभर पुढे नेणे गरजेचे आहे. गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्सवाची परंपरा जपताना शिस्त आणि पावित्र्य जपण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकासह प्रशासन, मंडळे आणि विविध संघटनांवर असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून गणेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम पद्धतीने साजरा होण्यासाठी प्रशासन, गणेशोत्सव मंडळे आणि समन्वय समित्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे.

## क्रांती चौक उड्डाणपुलावर भीषण अपघात; दुचाकीवरील दोन तरुण जागीच ठार, एक जखमी

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर

शहरातील क्रांती चौक उड्डाणपुलावर बुधवारी दुपारी दोन वाजता झालेल्या एका भीषण अपघातात जालन्यातील दोन तरुण जागीच ठार झाले, तर एक तरुण किरकोळ जखमी झाला. ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त जालन्यातील ८ ते ९ मित्र चार दुचाकींवरून छत्रपती संभाजीनगरमार्गे खुलताबादच्या उरुसासाठी निघाले होते. क्रांती चौक उड्डाणपूल उतरत असताना त्यांच्या दुचाकींचा आपसात धक्का लागला आणि एका दुचाकीवरील तिघे तरुण खाली रस्त्यावर कोसळले. त्याच वेळी मागून अत्यंत वेगात येणारी एक मालवाहू रिक्षा खाली पडलेल्या तरुणांच्या अंगावरून गेल्याने हा अपघात अत्यंत दुर्दैवी ठरला.

परवेज अफसर शेख (वय १७) आणि समीर शागीर शहा (वय २०) अशी या अपघातात प्राण गमावलेल्या मृत तरुणांची नावे आहेत, तर अर्शद मदार शहा (वय १७) हा तरुण अपघातावेळी विरुद्ध दिशेला फेकला गेल्याने सुदैवाने किरकोळ जखमी झाला आहे. हे सर्व तरुण जालना येथील रहिवासी होते. अपघातानंतर सोबतच्या मित्रांनी पोलिसांना तात्काळ कळवल्याशिवाय परवेज व समीर यांना उपचारासाठी थेट घाटी रुग्णालयात नेले. तेथे दुपारी चार वाजता डॉक्टरांनी तपासून दोघांना मृत घोषित केले. सायंकाळी पाच वाजता घाटी रुग्णालयातून माहिती मिळाल्यानंतर वेदांतनगर पोलिसांना या घटनेची खबर लागली, त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी आणि रुग्णालयात धाव घेतली.





घटनेची माहिती मिळताच मृतकांच्या कुटुंबातील नातेवाईक आणि मित्रांनी घाटी रुग्णालयाच्या शवविच्छेदन विभागाबाहेर मोठी गर्दी केली होती. प्रत्यक्षदर्शींचा जबाब आणि सीसीटीव्ही फुटेजच्या कसून तपासणीनंतर अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे वेदांतनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्रीनिवास रोयलावार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या अपघातात अकाली मृत्यू पावलेले तरुण अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातील होते. परवेजला तीन बहिणी असून त्याचे वडील प्रकृती अस्वास्थ्यामुळे आजारी असतात, तर समीरच्या कुटुंबात तीन बहिणी व दोन भाऊ असून घरची हलाखीची परिस्थिती असल्यामुळे त्याला त्याचे शिक्षणही अर्ध्यावरच सोडावे लागले होते. या मनाला वेदना देणाऱ्या दुर्घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर संपूर्ण दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## लघु, मध्यम प्रकल्पांची स्थिती चिंताजनक ; 6 धरणांत 30 टक्क्यांपेक्षा कमी जलसाठा

### पावसाअभावी मराठवाड्यातील चित्र विचित्र!

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

ऑगस्ट महिना संपत आला तरी छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण मराठवाड्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने धरणांमधील पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक आहे. विभागातील ११ मोठ्या धरणांपैकी स्६ धरणांमध्ये ३० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा आहे. लघु आणि मध्यम प्रकल्पांमध्येही गतवर्षीच्या तुलनेत निम्माच जलसाठा उपलब्ध असल्याचे जलसंपदा विभागाकडून प्राप्त ताज्या प्रकल्प पाणीसाठी अहवालातून समोर आले.

जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार मध्यम प्रकल्पांत सुमारे २५ टक्क, तर लघु प्रकल्पांत १७.७३ टक्के पाणीसाठा आहे. जायकवाडीत ९४ टक्क्यांहून अधिक जलसाठा आहे. या पाठोपाठ नांदेडच्या विष्णुपुरीमध्ये ९९, तर मानार प्रकल्पात ५९ टक्के पाणीसाठा आहे. परभणीतील येलदरी प्रकल्पात ६२, पेनगंगा प्रकल्पात ६७ टक्के पाणीसाठा आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर धरणात ३१ टक्के जलसाठा आहे. या पाठोपाठ नांदेडच्या विष्णुपुरीमध्ये ९९ तर मानार प्रकल्पात ५९ टक्के पाणीसाठा आहे. परभणीतील येलदरीत ६२, पेनगंगा प्रकल्पात ६७ टक्के पाणी आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर धरणात ३१ टक्के, माजलगाव धरणात २३ टक्के, निम्नतेरणा व निम्न दुधनामध्ये केवळ २५ टक्के पाणीसाठा आहे. तसेच लातूरच्या मांजरा प्रकल्पात केवळ १४ टक्के जलसाठा आहे.

लघु, मध्यम प्रकल्पात अत्यल्प पाणी मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची गरज पूर्ण करण्यात भूमिका बजावणाऱ्या लघु, मध्यम प्रकल्पांची अवस्था दयनीय आहे. मराठवाड्यात ८०४ लघु प्रकल्प तर ८१ मध्यम प्रकारची धरणे आहेत. एल निनोचा सर्वाधिक फटका या धरणांना बसला आहे.

मागील वर्षी होता दुप्पट साठा

मागील वर्षी मराठवाड्यात ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात चांगला मुसळधार पाऊस सर्वत्र कोसळला होता. यामुळे बहुतेक मोठ्या धरणांत गतवर्षी आजच्या दिवशी दुप्पट जलसाठा होता. मोठ्या धरणांत सरासरी २० टक्के, तर मध्यम प्रकल्पांत ५८ टक्के आणि लघु प्रकल्पांमध्ये ३५ टक्के पाणीसाठा होता.

## नेपाळच्या पुराचा बिहार-उत्तर प्रदेशालाही धोका; 7 जिल्ह्यांना अलर्ट

पाटणा : नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुराचा परिणाम आता भारतातील सीमावर्ती राज्यांवरही होण्याची शक्यता आहे. नेपाळमधून मोठ्या प्रमाणात पाणी बिहारच्या दिशेने येण्याची शक्यता लक्षात घेता राज्यातील ७ जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. संभाव्य पूरस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून, पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पुराचे पाणी भारतातील नद्यांमध्ये आल्यास बिहार आणि उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः गंडक नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या भागांवर प्रशासनाचे विशेष लक्ष आहे.

## वेरूळ स्वच्छ, सुंदर करण्यासाठी प्रशासनाचे श्रमदान; तीन तासांच्या स्वच्छता अभियानात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यटन व धार्मिक महत्त्व असलेल्या वेरूळ येथे प्रशासनाच्या वतीने गुरुवारी विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थांनी श्रमदानातून अवघ्या तीन तासांत वेरूळ परिसर स्वच्छ केला.



वेरूळ नगरपरिषदेच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या अभियानात जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, आमदार प्रशांत बंब, छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजूरकर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., जिल्हा परिषद सदस्य कृणाल दांडगे, पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे, वेरूळच्या सरपंच कुसुमबाई प्रकाश मिसाळ, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले.

श्रावण महिन्यात वेरूळ येथे भाविक आणि पर्यटकांची मोठी गर्दी होत असल्याने त्यांना स्वच्छ, सुंदर आणि निरोगी वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात आले. वेळोवेळी स्वच्छता राखून परिसराचे सौंदर्य आणि आरोग्यदायी वातावरण कायम ठेवणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सांगितले.

विकासकामांची पाहणी

स्वच्छता अभियानानंतर वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरातील विविध विकासकामांची पाहणी करण्यात आली. भक्ती निवास, नवीन दुकाने तसेच नवीन मार्गाच्या कामांचा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी संबंधित अधिकाऱ्यांसह आढावा घेतला. यावेळी स्थानिक रहिवासी आणि दुकानदारांशी चर्चा करून भाविक व पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

आरोग्य विभागाचा सक्रिय सहभाग

अभियानात आरोग्य विभागानेही सक्रिय सहभाग नोंदविला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान राऊत, डॉ. रंगनाथ तुपे, वैद्यकीय अधिकारी डॉ. आफताब शेख, डॉ. अविनाश बेरे यांच्यासह जिल्हा, तालुका आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील अधिकारी-कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविकांनी श्रमदान केले.

'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव'चा संदेश

यावेळी डॉ. अभय धानोरकर यांनी 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचे महत्त्व स्पष्ट केले. निरोगी जीवनासाठी परिसराची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि कचऱ्याचे योग्य विलगीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता ती नियमित सवय बनली पाहिजे, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## प्रसादाची शुद्धता आणि प्रशासकीय शिस्त

महाराष्ट्राचा राज्य उत्सव असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदा, सुव्यवस्था आणि प्रसादाच्या सुरक्षेबाबत दिलेले निर्देश अत्यंत महत्त्वाचे आहेत. उत्सवाचा उत्साह जपतानाच भाविकांना मिळणारा प्रसाद शुद्ध आणि भेसळमुक्त असणे ही काळाची गरज आहे. यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे पालन करणे आणि मंडळांनी यासंदर्भात प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या उत्सवाचे सामाजिक अभिसरण आणि प्रबोधनाचे स्वरूप टिकवून ठेवतानाच, उत्सवातील पावित्र्य व शिस्त राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई, पुण्यासह राज्यभरातील मंडळांमध्ये परवानग्या आणि पायाभूत सुविधांवरून दरवर्षी निर्माण होणारे प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. जुन्या मंडळांच्या नियमित परवानग्या तातडीने मंजूर करणे, आगमनाचे व विसर्जनाचे मार्ग खड्डेमुक्त ठेवणे आणि रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्था करणे या सूचना अंमलात आल्यास भाविकांचा आणि कार्यकर्त्यांचा मोठा मनस्ताप टळेल. याशिवाय, ट्रस्टच्या नावावर असलेल्या कार्यालयांना मालमत्ता करमाफी देण्याचा निर्णय गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा देणारा आहे. मोठ्या गणेशमूर्तींच्या सुरक्षेची काळजी घेणे, फटाके व ध्वनिक्षेपकांच्या (लाऊडस्पिकर) नियमांचे उल्लंघन रोखणे आणि विसर्जनादरम्यान सुरक्षेची पडताळणी करणे या बाबींवर पोलिसांनी कडक नजर ठेवणे गरजेचे आहे. न्यायालयाने पीओपी मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात घेतलेल्या निर्णयांचे पालन करत पर्यावरणाचे रक्षण करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून तो राज्याच्या संस्कृतीचा आणि एकतेचा प्रतीक आहे. त्यामुळे प्रशासन, पोलीस, महापालिका आणि गणेशोत्सव मंडळांनी आपसातील समन्वय अधिक मजबूत करून हा उत्सव सुरक्षित, प्रदूषणमुक्त आणि विघ्नविरहित पार पाडण्यासाठी कटिबद्ध राहायला हवे.

## महमूदपुरा हेरिटेज वॉकचे रविवारी आयोजन निजामशाहीकालीन वारशाची ऐतिहासिक सफर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मध्ययुगीन काळातील बलाढ्य फौजांना दख्खनमध्ये आपल्या कर्तृत्वाने थोपवणारा आणि नहरीने पाणी आणून जुन्या खडकीचे सुनियोजित शहरात रूपांतर करणारा निजामशाहीचा वजीर मलिक अंबर यांच्या ऐतिहासिक वारशाची ओळख करून देण्यासाठी *‘महमूदपुरा हेरिटेज वॉक’**चे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि INTACH, छत्रपती संभाजीनगर चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने हा हेरिटेज वॉक रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

मा. महापौर श्री समीर राजुरकर यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या पर्यटन विभागाचे वतीने मा.आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार व उप आयुक्त तथा विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ऐतिहासिक ठिकाणी हेरिटेज वॉक चे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे.या उपक्रमास नागरिक ,इतिहास प्रेमी आणि विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात साथ लाभत आहे.याच अनुषंगाने दिनांक ३० ऑगस्ट रोजी हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे. या हेरिटेज वॉकची सुरुवात नहर-ए-अंबरी गोमुख, ताज हॉटेलसमोर येथून होणार असून सांगता श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर, वानखेडेनगर येथे होणार आहे. या माध्यमातून महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, स्थापत्यशैली, जलव्यवस्था आणि निजामशाहीकालीन वारशाचा जवळून परिचय करून दिला जाणार आहे. ऐतिहासिक वारशाचा समृद्ध ठेवा महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक मकबरा, नहर-ए-अंबरीचा ऐतिहासिक वारसा तसेच श्री निळकंठेश्वर महादेव मंदिरातील राजपूत छत्री शैलीतील बारादरी ही या हेरिटेज वॉकची प्रमुख आकर्षणे आहेत. या वास्तूंच्या माध्यमातून शहराच्या समृद्ध इतिहासातील अनेक महत्त्वपूर्ण पैलू नागरिकांसमोर उलगडले जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर शहराचा ऐतिहासिक वारसा केवळ वास्तूंमध्ये सीमित नसून त्यामागील जलव्यवस्था, स्थापत्यकला, सामाजिक जीवन आणि तत्कालीन नगररचनेची माहितीही या उपक्रमातून नागरिकांना अनुभवता येणार आहे.इतिहासप्रेमी, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांनी आपल्या शहराच्या ऐतिहासिक वारशाची ओळख करून घेण्यासाठी या हेरिटेज वॉकमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक सहायक आयुक्त ऋतुजा पाटील, मार्गदर्शक Intach चे संकेत कुलकर्णी व आदित्य वाघमारे यांनी केले आहे.

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात ‘खेलो इंडिया संवाद : खेल की बात, पीएम के साथ – युवा कनेक्ट’ कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**परभणी :**-वनामकृवितील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका बळकट करणे, या उद्देशाने देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी आभासी माध्यमातून देशभरातील विविध ठिकाणांहून सहभागी झालेल्या लाखो युवकांशी तसेच परभणी जिल्ह्यातील युवकांशी संवाद साधला.

यानिमित्ताने परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि मेरा युवा भारत (MY Bharat), परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘खेलो इंडिया संवाद - खेल की बात, पीएम के साथ – युवा कनेक्ट’ या विशेष कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले.

‘युवा कनेक्ट’ या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, खेळाडू, युवा नेते, स्वयंसेवक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणून भारतातील क्रीडा क्षेत्राचा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि भविष्यातील संधी याबाबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमास परभणी जिल्ह्याचे सन्माननीय लोकसभा सदस्य मा. खा. श्री. संजय जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे ऑनलाइन माध्यमातून अध्यक्षस्थानी उपस्थित होते. यावेळी शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. नीता गायकवाड, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम, जिल्हा युवा अधिकारी श्री. प्रणित सांगवीकर तसेच टेबल टेनिसमधील राष्ट्रीय विजेते खेळाडू श्री. शिवानंद पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांनी युवकांना क्रीडा, युवाशक्ती आणि राष्ट्रनिर्माणातील युवकांच्या भूमिकेबाबत केलेल्या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांनी घेतला. कार्यक्रमात माननीय केंद्रीय क्रीडामंत्री, माननीय क्रीडा राज्य मंत्री, विविध राज्यांचे माननीय मुख्यमंत्री तसेच देशभरातील विद्यापीठाचे प्रमुख अधिकारी, प्राध्यापक, शास्त्रज्ञ आणि महाविद्यालयांतील विद्यार्थी आभासी माध्यमातून सहभागी झाले.

माननीय केंद्रीय क्रीडामंत्री श्री. मनसुख मांडविया यांनी युवकांना योग्य दिशा देणे आवश्यक असल्याचे सांगितले. युवक हे राष्ट्रनिर्माणात योगदान देणारे महत्त्वपूर्ण घटक असून, त्यांच्या माध्यमातूनच विकसित भारताचे स्वप्न पूर्णत्वास येईल, असे त्यांनी नमूद केले. युवकांना घडविण्यासाठी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखाली कौशल्य विकास, उद्योजकता विकास आणि रोजगाराच्या विविध संधींची दालने खुली करण्यात आली आहेत. तसेच ‘खेलो इंडिया’च्या माध्यमातून युवकांना २०३६ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धांसाठी भारतीय खेळाडू तयार करण्याबरोबरच त्यांचा शारीरिक विकास साधण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माननीय खासदार श्री. संजय जाधव यांनी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांचा युवकांसाठीचा संदेश महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. ‘सशक्त भारत, नशामुक्त भारत’ निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कोणत्याही आई-वडिलांची अपेक्षा आपल्या पाल्याने सुसंस्कृत होऊन मोठे अधिकारी व्हावे, अशी असते; मात्र अनेक युवक व्यसनांच्या आहारी जाताना दिसतात. त्यांना या विळख्यातून बाहेर काढणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले. मोबाईलचे अतिवापराचे व्यसनदेखील सध्याच्या काळातील गंभीर समस्या असून, युवकांनी त्यापासून दूर राहावे आणि इतरांमध्येही याबाबत जागरूकता निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले. शरीरसंपदा जपण्यासाठी मैदानी खेळ आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळाची आवड जोपासावी, असे त्यांनी सांगितले. परभणी जिल्ह्यातील खेळाडू राष्ट्रीय पातळीवर सातत्याने चमकत आहेत. खेळाच्या माध्यमातून सर्वजण एकत्र येतात; जात-धर्माचा भेद राहत नाही आणि एकोपा वाढतो. त्यामुळे सर्वांनी खेळाला महत्त्व द्यावे, तसेच युवकांनी परस्परांशी अधिकाधिक संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी आजचा दिवस अत्यंत महत्त्वपूर्ण असून, युवकांना योग्य दिशा व मार्गदर्शन देणे आवश्यक असल्याचे सांगितले. युवक हे राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वाचे घटक असून, देशाचे यश आणि अपयश हे युवकांच्या शक्तीच्या योग्य वापरावर अवलंबून आहे. युवकांकडे मोठी ऊर्जा आणि क्षमता आहे; तिचा योग्य दिशेने उपयोग केला पाहिजे. आजचे युवक भविष्यात देशाची धुरा सांभाळणारे व्यक्तिमत्त्व असतील आणि त्यांच्या हातून देश घडणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात ‘युवा कनेक्ट’च्या माध्यमातून युवकांशी सातत्याने संवाद व समन्वय ठेवणे आवश्यक आहे. यातूनच देश आणि समाजाचे हित साध्य होईल. विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमधील नाते अधिक दृढ होण्याच्या दृष्टीनेही त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी हे केवळ स्वतःच्या भविष्यासाठीच नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीसाठीही महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी सदैव संपर्कात राहण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना निःसंकोचपणे संपर्क साधता येईल, असे वातावरण विद्यापीठात निर्माण करण्याचे आवाहन त्यांनी केले. ‘युवा कनेक्ट’ उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये दृढ नाते असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी ‘खेलो इंडिया’उपक्रमाची माहिती देताना क्रीडा संस्कृती जपण्यासाठी अभ्याससोबतच खेळाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धांच्या अनुषंगाने भारताला क्रीडा क्षेत्रात सक्षम करण्याच्या माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे त्यांनी आवाहन केले. भारतातील पारंपरिक व महत्त्वाच्या खेळांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देण्याची गरज असून, शरीर, मन आणि आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी खेळांना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांनी केले. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वाखाली युवकांचे भवितव्य घडविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठात शैक्षणिक उपक्रमांसोबतच नशामुक्ती आणि इतर सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. सुदृढ आयुष्य जगण्यासाठी विद्यार्थ्यांनी किमान एका मैदानी खेळाची आवड जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यापीठाचे क्रीडा शिक्षक डॉ. संघर्ष शृंगारे यांनी केले, तर आभार जिल्हा युवा अधिकारी श्री. प्रणित सांगवीकर यांनी मानले.

## संविधानाची तत्व पायदळी तुडविणाऱ्या सत्ताधाऱ्या विरुध्द ओबीसी रस्त्यावर उतरणार- प्रा. लक्ष्मण हाके

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोलीः राज्यात संविधानाचे तत्व पायदळी तुडवून ओबीसी आरक्षण संपविले जात आहे. अशा सत्ताधाऱ्याविरूध्द १ सप्टेंबर रोजी राज्यातील आबीसीसमाज रस्त्यावर उतरणार असल्याचे प्रतिपादन प्रा. लक्ष्मण हाके यांनी हिंगोलीत केले.

हिंगोली येथील शासकिय विश्रामगृहात दि. २६ ऑगस्ट बुधवार रोजी नियोजित मोर्चाच्या पूर्व तयारी संदर्भात ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या बैठकी नंतर प्रा. हाके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते पुढे म्हणाले की, राज्यात ओबीसी आरक्षण संपविण्याचे काम या राज्यकत्यांनी केले असून जवळपास ओबीसी आरक्षण संपल्यसात जमा आहे. ओबीसींच्या जागेवर आता मराठा दिसणार आहेत. मराठा समाजाला नवीन कायद्यानुसार ईडब्ल्यूएस अंतर्गत सरकारनी आरक्षण द्यावेत. परंतू ओबीसीमध्ये मराठ्यांना घुसविण्याचे

काम करू नये हा इशारा देण्यासाठी १ सप्टेंबर रोजी दौंड तालुक्यतील पाटस टोल नाक्याहून लाखो ओबीसी समाज मुंबईच्या दिशेने वाटचाल करेल आणि आझाद मैदानावर ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी हे आंदोलन असेल. या आंदोलनात ओबीसीमधील सर्व घटक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे प्रा. हाके यांनी सांगितले. ओबीसी एल्गार



समितीचे एडवोकेट रवी शिंदे सुरेश सराफ दिनकर कोकरे गोपाल सातपुते प्रा गजानन थोरात अशोक शिरामे भास्कर पोले डॉ अनिल पोळ हिम्मत राठोड विलास आघाव बबन मस्के यांच्यासह अनेक हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी

मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना प्रा. हाके म्हणाले की, तत्कालीन पंतप्रधान व्हि. पी. सिंग यांनी लागु केलेल्या मंडल आयोगामुळे ओबीसींच्या आयुष्यात नवीन पर्व आले होते. मात्र मागील तीन ते चार वर्षात राजकारण्यांनी, सत्ताधाऱ्यांनी ओबीसींचे आरक्षण संपविले आहे. त्यामुळे ओबीसींवर अन्याय होत असून स्वातंत्र्यांच्या लढ्या प्रमाणे पुन्हा एक दा ओबीसींच्या हक्काचा लढा उभा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या राज्यात सध्या सत्ताधारी, विरोधक देखील ओबीसींच्या बाजूने बोलण्यास तयार नाहीत. ओबीसींचे आरक्षण संपलेले आहे, मात्र काही जण ओबीसी आरक्षण संपलेले नाही असे सांगत आहेत. त्यांनी ओबीसी आरक्षण कसे संपले नाही हे दाखवून द्यावे असे आव्हान त्यांनी यावे-ळी दिले. देशात एकीकडे आदिवासी समाजाला राष्ट्रपतीपद देता अन दुसरीकडेआदिवासी तरुणांना विद्यार्थ्यांना १३ दिवस उपोषण करायला लावताय हे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली जाणारी गोष्ट आहे. समाज कल्याण खात्याचा निधी इतरत्र वळविला जातो याकडे समाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी पुढे येऊन बोलले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी आमदार प्रसाद लाड, बबनराव तायवाडे यांच्यावरही टिका केली. राज्यातील ओबीसी आमदार

निवडणुक येणार नाही, त्यांचे राजकारण संपवू असे काही जण बोलत आहेत, मात्र आता आम्ही ओबीसी बांधव यापुढे कोणाला निवडून आणायचे, कोणाला पाडायचे हे ठरविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील ओबीसींच्या आरक्षणासाठी मुंबई येथे आंदोलन केल जाईल. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानगीचे अर्ज मुंबई पोलिस विभागाला दिले आहेत असेही हाके म्हणाले.

## रस्ता सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन काळाची गरज; आयएसटीडी संभाजीनगर चॅप्टरतर्फे ‘रस्ता सुरक्षा जनजागृती’ सत्र

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** वाढते रस्ते अपघात, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि वाहनचालकांकडून होणारे निष्काळजीपणाचे प्रकार पाहता रस्ता सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे. प्रत्येक वाहनचालकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून जबाबदारीने वाहन चालविल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात. रस्ता सुरक्षा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन समृद्धी महामार्गाचे समन्वयक तथा आयएसटीडीचे रिजनल व्हाईस प्रेसिडेंट (वेस्ट) डॉ. सुरेंद्र गेडाम यांनी केले.

इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (आयएसटीडी), छत्रपती संभाजीनगर चॅप्टरतर्फे मंगळवारी (२५ ऑगस्ट) डॉ. हेडगेवार रुग्णालयात ‘रस्ता सुरक्षा’ विषयावर जनजागृतीपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरटीओ अधिकारी पूजा वानखेडे, आयएसटीडी छत्रपती संभाजीनगर चॅप्टरचे चेअरपर्सन प्रा. जयप्रकाश बागडे, सेक्रेटरी अशोक गुरनाळे, सखाराम नन्नावरे, हेडगेवार रुग्णालयाचे एचआर हेड रवींद्र कोल्हारकर आणि रवींद्र इंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गेडाम यांनी वाहन चालविताना संयम, शिस्त आणि जबाबदारी या तीन बाबींना विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे, हेल्मेटचा योग्य वापर करणे, चारचाकी वाहनात सीट बेल्ट लावणे, वाहतूक सिग्नलचे पालन करणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे तसेच मद्यपान करून वाहन न चालविण्याचे आवाहन त्यांनी केले.

आरटीओ अधिकारी पूजा वानखेडे यांनी वाहतूक नियम, वाहनचालकांची कायदेशीर व सामाजिक जबाबदारी, रस्त्यावरील शिस्त आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी करण्यास मोठी मदत होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

रस्त्यावर वाहन चालविताना केवळ स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार न करता पादचारी, दुचाकीस्वार, सायकलस्वार आणि इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचीही काळजी घेणे आवश्यक आहे. किरकोळ वाटणारे नियमांचे उल्लंघनही गंभीर अपघाताला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे सुरक्षित वाहनचालकत्वाची संस्कृती निर्माण करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र कोल्हारकर यांनी केले, तर रवींद्र इंगे यांनी आभार मानले. कार्यक्रमास आयएसटीडीचे सदस्य तसेच हेडगेवार रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

## शाश्वत कृषी विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर भर; कृषी अभियंत्यांचे 38 वे राष्ट्रीय अधिवेशन सुरू; दोन दिवस विविध तांत्रिक सत्रांत मंथन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हवामान बदल, पाणीटंचाई, मृदा आरोग्य आणि वाढता उत्पादन खर्च या आव्हानांवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी कृषी अभियंत्यांचे ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन व राष्ट्रीय परिसंवादाला गुरुवारी (२७) एमआयटी सभागृहात सुरुवात झाली. शाश्वत आणि हवामान बदलास अनुकूल कृषी विकासासाठी कृषी अभियांत्रिकीतील उदयोन्मुख तंत्रज्ञान ही परिसंवादाची मध्यवर्ती संकल्पना आहे. देशभरातून सुमारे ५०० शेतकरी तसेच १०० संशोधक व प्राध्यापक या अधिवेशनात सहभागी झाले आहेत.

द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) यांच्या सहकार्याने आयईआय महाराष्ट्र राज्य केंद्र आणि एमआयटी यांच्या वतीने २७ व २८ ऑगस्टदरम्यान हे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. उद्घाटन सत्राला आयईआय महाराष्ट्र राज्य केंद्राचे अध्यक्ष अभियंता विजय कांबळे, आयईआयचे राष्ट्रीय अध्यक्ष अभियंता मनीष कोठारी, कृषी अभियांत्रिकी विभागीय मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. नेमीचंद्रप्पा एम., एमआयटीचे महासंचालक प्रा. मुनीश शर्मा आणि अधिवेशनाचे निमंत्रक प्रा. डॉ. दीपक बोरनारे उपस्थित होते. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांचीही प्रमुख उपस्थिती होती.



अधिवेशनात कृषी अभियांत्रिकी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आयईआय यंग इंजिनिअर्स पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यानंतर डॉ. राजेश तुळशीराम ठोकळ यांचे स्मृती व्याख्यान झाले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर बीजभाषण केले.

शुक्रवारी विविध तांत्रिक सत्रे, कार्यशाळा आणि विशेष तांत्रिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनातून पुढे येणाऱ्या महत्त्वपूर्ण शिफारशी समारोप सत्रात अंतिम करण्यात येणार आहेत. हवामान बदल, पाणीटंचाई, मृदा आरोग्य आणि वाढता उत्पादन खर्च यांसारख्या समस्यांवर व्यावहारिक उपाय सुचविण्यास या अधिवेशनाची मदत होईल, अशी माहिती निमंत्रक प्रा. (डॉ.) दीपक त्र्यंबक बोरनारे यांनी दिली.

१०० संशोधनपर लेखांचे तांत्रिक सत्रांत सादरीकरण

परिसंवादासाठी देशभरातून सुमारे १०० संशोधनपर लेख प्राप्त झाले आहेत. त्यांचे पाच तांत्रिक सत्रांमध्ये प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन पद्धतीने सादरीकरण करण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, अचूक शेती, स्मार्ट सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, मृदा व जलसंधारण, हवामान बदल, जैवकोळसा, नवीकरणीय ऊर्जा आणि शाश्वत कृषी विकास या विषयांवर या सत्रांमध्ये सखोल मंथन होणार आहे.

# देऊळगाव गात येथील जिल्हा परिषद शाळा इमारतीचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकार्पण

## आधुनिक शिक्षण सुविधांनी सुसज्ज शाळा विद्यार्थ्यांच्या सेवेत; विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व कौशल्याधारित शिक्षण देण्यावर भर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, देऊळगाव गात (ता. सेलू) येथे सुमारे पावणेतीन कोटी रुपये खर्चातून उभारण्यात आलेल्या सुसज्ज शालेय इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या या शाळेत विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष लता वाकळे, सेलूचे नगराध्यक्ष मिलिंद सावंत, जिल्हा परिषद सदस्य प्रीती डख, अजय डासाळकर, पंचायत समिती सदस्य शिवराम कदम, गटविकास अधिकारी उदय जाधव, गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष माऊली कदम आदी उपस्थित होते.

सन १९४३ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत सध्या पाचवी ते दहावीपर्यंत सुमारे ३५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध शालेय स्पर्धा, परीक्षा तसेच ज्ञान-विज्ञानविषयक उपक्रमांमध्ये विद्यार्थी सहभागी होत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जात आहेत.

यावेळी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, देऊळगाव गात येथे खासगी शाळांनाही लाजवेल अशी सुसज्ज शाळेची इमारत उभी राहिली आहे. विद्यार्थ्यांना



जागतिक दर्जाचे शिक्षण त्यांच्या परिसरातच मिळावे, यासाठी अशा शाळा विकसित होणे आवश्यक आहे. पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या शाळेचा लाभ घ्यावा. शाळा सुसज्ज झाल्याने विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांची जबाबदारीही वाढली आहे.

केवळ नोकरी मिळविण्यासाठी नव्हे, तर उद्यमशीलता निर्माण करणारे शिक्षण आवश्यक आहे, असे सांगून पालकमंत्र्यांनी कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीनुसार त्याला विविध क्षेत्रांत संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज विविध क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध असून, त्या संधींचे सोने करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. समाजातील सर्वच घटकांतील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यामुळे त्याच तोडीच्या शैक्षणिक सुविधा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. या शाळेतील प्रयोगशाळा, टिंक लॅब आणि डिजिटल सुविधांचा विद्यार्थ्यांनी प्रभावी वापर करून प्रयोगशील व नवोन्मेषी विचार विकसित करावा, असे आवाहन त्यांनी केले. तालुक्यातील रोजगाराच्या संधींबाबत बोलताना पालकमंत्र्यांनी कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. सेलू येथील आयटी क्षेत्रातील कंपन्यांमध्ये स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यातून सुमारे ६०० युवकांना रोजगारनिर्मितीची संधी निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देत पालकमंत्री म्हणाल्या की, येथील मुला-मुलींना जगातील सर्वोत्तम शैक्षणिक सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करून अभ्यासाकडे लक्ष द्यावे. पालक व शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर लक्ष ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देताना रक्षाबंधनानिमित्त शाळा परिसरात वृक्षारोपण करण्याचे आवाहन करण्यात आले.

# सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.२७ ऑगस्ट

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामीण रुग्णालय सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालय सोयगाव यांच्या 'इंटेन्सिफाइड कॅम्पेन'अंतर्गत संवेदनशील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ विभागाचे प्राचार्य डॉ. उल्हास पाटील हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. मनोजकुमार चोपडे उपस्थित होते.सोयगाव ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य विभागाचे समुपदेशक सुनील वानखेडे व अतुल मुळे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक विविध बाबींवर मार्गदर्शन केले.कार्यशाळेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करून संवेदनशील विषयांबाबत योग्य माहिती,प्रतिबंधात्मक उपाय आणि सामाजिक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रा.रवींद्र जाधव,प्रा.सुभाष पाटील,प्रा.तोफिक शेख व प्रा.अनिल मानकर,प्रा.स्वाती देशमुख,प्रा.भारती पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील चौधरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.शिवाजी शिरसाठ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट या बाबीसाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पात्र लाभार्थींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे दि. 4 सप्टेंबर 2026 पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी शेतकरी उत्पादक संस्था (FPOs), क्लस्टर स्तर महासंघ (CLFs), प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS), वैयक्तिक शेतकरी तसेच कोणत्याही अधिनियमांतर्गत नोंदणीकृत इतर उपक्रम पात्र आहेत.

गट लाभार्थी संस्था किमान मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान 15 टक्के रक्कम आणि कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असणे आवश्यक असून, बँक कर्ज घेणे अनिवार्य आहे. वैयक्तिक लाभार्थ्याचे वय किमान 21 वर्षे पूर्ण असावे. एका कुटुंबातील (स्वतः, पती/पत्नी व अविवाहित मुले) केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. तसेच प्रकल्प खर्चाच्या किमान 15 टक्के रक्कम आणि कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असणे आवश्यक आहे. या घटकांतर्गत प्रकल्प खर्चाच्या 33 टक्के किंवा कमाल 25 लाख रुपये प्रति युनिट, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येईल. अनुदान केवळ यंत्रसामग्री खरेदी तसेच इमारत, गोदाम व साठवण पायाभूत सुविधा बांधकामासाठी देय राहील.

अर्जासोबत विहित नमुन्यातील अर्ज, यंत्रसामग्रीचे अधिकृत दरपत्रक तसेच यंत्रसामग्रीचा राष्ट्रीय मानकीकरण संस्था (BIS) यांचा टेस्ट रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त प्रस्तावांची जिल्हास्तरीय कडधान्य सुकाणू समिती (DSCP) मार्फत छाननी व तांत्रिक मूल्यांकन करण्यात येईल. समितीच्या शिफारशीनुसार प्रस्तावांना अंतिम मान्यता देण्यात येईल.

तरी जिल्ह्यातील पात्र लाभार्थींनी दि. 4 सप्टेंबर 2026 पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे ऑफलाईन पद्धतीने अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. योजनेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह मूलभूत सुविधांसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन करा

## पालकांसह सामाजिक संघटनांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थी ही देशाची खरी ताकद असून, तेच उद्याचे संशोधक आणि नेतृत्वकर्ते आहेत. त्यांच्या मौल्यवान वेळेचा सदुपयोग करून त्यांना खऱ्या अर्थाने ज्ञानार्थी आणि अभ्यासू बनवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, सध्या ग्रामीण व शहरी भागातील शाळा, महाविद्यालयांच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राज्य शासनाने निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली कायमस्वरूपी आयोग स्थापन करावा, अशी आग्रही मागणी पैठण परिसरातील नागरिक, पालक आणि सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शाळांची दुरवस्था आणि आरोग्याचा प्रश्न सध्या अनेक शाळांमध्ये पिण्याचे पाणी नाही, काही ठिकाणी वर्गखोल्यांमध्ये बसण्यासाठी पुरेशी बाकडे नाहीत. पावसाळ्यात अनेक शाळांच्या इमारती गळतात, ज्यामुळे वर्ग भरवणे अशक्य होते. कित्येक गावांत शाळाच नसल्याने मुलांना दुसऱ्या गावात पायपीट करावी लागते. जिथे रस्ते आहेत तिथे वेळेवर एसटी बस जात नाही, तर जिथे बसची सोय होऊ शकते तिथे रस्त्यांची दुरवस्था आहे. अनेक ठिकाणी शाळांच्या आवाराला खेटूनच उघडी सांडपाण्याची गटारे व नाले वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरते. यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येत असून संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत आहे.

शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय-निमशासकीय वसतिगृहे आणि खासगी कोचिंग क्लासेसच्या मार्गावर देशी दारूची दुकाने, बिअर बार, हॉटेल्स आणि अवैध धंद्यांचे अड्डे राजरोसपणे थाटण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असून, ते व्यसनाधीनतेच्या विळख्यात अडकण्याची भीती व्यक्त होत आहे. शैक्षणिक संस्थांपासून किमान ३०० ते ४०० मीटर अंतरापर्यंत अशी कोणतीही दुकाने असू नयेत, अशी नियमावली तातडीने लागू करून त्याची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्षम मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांनी या सर्व समस्यांची गांभीर्याने दखल घेऊन भावी पिढीच्या सुरक्षित शिक्षणासाठी ठोस पावले उचलावीत, असा सूर पालक वर्गातून उमटत आहे.

तहसीलदार, पोलीस अधिकारी, वकील, वैद्यकीय अधिकारी, स्थानिक शिक्षणतज्ज्ञ आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त समिती स्थापन करून दरमहा विद्यार्थ्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यात यावा, जिल्हाधिकाऱ्यांनी दर दोन महिन्यांनी आणि विभागीय विकास आयुक्त (महसूल आयुक्त) यांनी दर तीन महिन्यांनी नियमित आढावा बैठक घ्यावी,

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोयगाव येथे रक्षाबंधनाचा उपक्रम उत्साहात साजरा




दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.२७ ऑगस्ट

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांमध्ये प्रेम,बंधुभाव,एकता आणि सामाजिक सलोखा वाढीस लागावा,या उद्देशाने आज रक्षाबंधनाचा सुंदर उपक्रम मोठ्या उत्साहात घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांना रक्षाबंधन सणाचे महत्त्व,त्यामागील संस्कृती व परंपरा तसेच भाऊ-बहीण यांच्यातील प्रेम,आपुलकी आणि संरक्षणाचे नाते याविषयी माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधून रक्षाबंधनाचा आनंद साजरा केला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे हिंदू-मुस्लिम विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधत दिलेला बंधुभाव, एकता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश.धर्माच्या पलीकडे जाऊन प्रेम,मैत्री आणि माणुसकीचे नाते जपण्याचे सुंदर उदाहरण या निमित्ताने पाहायला मिळाले. एकमेकांच्या मनगटावर राखी बांधताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता.

या उपक्रमास केंद्रप्रमुख फिरोज तडवी व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवान सोनवणे व सदस्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली.त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून रक्षाबंधनासारख्या सणांमधून प्रेम,एकता,बंधुभाव आणि माणुसकीचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजतात, असे मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. 'राखीचा धागा जोडतो नाती, मने आणि माणुसकी' हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून प्रत्यक्षात साकारला.

कार्यक्रमाच्या यशस्वी करण्याकरिता

कार्यक्रम आयोजन करते मुख्याध्यापक हरिदास काटोले किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अंकुश काळे, विवेक महाजन कला निर्देशक,तानाजी चव्हाण कार्यानुभव निर्देशक,अनिल देसाई क्रीडा निर्देशक,तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कापूस उत्पादकता अभियान 'कापूस क्रांती' अंतर्गत बायोचार युनिट व कॉटन श्रेडरसाठी अर्ज करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान 'कापूस क्रांती' अंतर्गत कृषी विभागामार्फत बायोचार युनिट व कॉटन श्रेडर या बाबींसाठी पात्र लाभार्थींची निवड करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील पात्र लाभार्थींनी महाडीबीटी पोर्टलवर तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

बायोचार युनिटसाठी वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्था पात्र आहेत. या घटकासाठी प्रति युनिट 10 हजार रुपये किंवा खर्चाच्या 50 टक्के, यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून देय आहे. लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

कॉटन श्रेडरसाठीही वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तसेच कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्था पात्र आहेत. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी 50 टक्के, कमाल 75 हजार रुपये प्रति युनिट, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी 40 टक्के, कमाल 60 हजार रुपये प्रति युनिट अनुदान देय आहे. या घटकासाठीही लाभार्थी निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

तरी जिल्ह्यातील पात्र लाभार्थींनी उत्स्फूर्तपणे महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. योजनेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी केले आहे.

# सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदाकरीता मोफत पूर्व प्रशिक्षणाची संधी

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी.

**परभणी :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि. 21 ते 30 सप्टेंबर, 2026 या कालावधीत एस.एस.बी. कोर्स क्र. 66 आयोजित करण्यात आला आहे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी - training.pctcnashik@gmail.com व दूरध्वनी क्र. 0253-2451032 किंवा व्हाटसअप क्र.9156073306 वर कार्यालयीन वेळेत अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी केंद्रामध्ये 20 सप्टेंबर, 2026 रोजी सकाळी 10 वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर रहावे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. परभणी जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी येथे 10 सप्टेंबर, 2026 रोजी मुलाखतीस हजर रहावे, मुलाखातीस येते वेळी त्यांनी डिर्पाटमेंट ऑफ सैनिक वेल्फेअर, पुणे (डीएसब्लू) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील एस.एस.बी. 66 कोर्स साठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

सदर एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झमिनेशन अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झमिनेशन पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शनबोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी स्पेशल एन्ट्री साठी एस.एस. बी मुखाखतीसाठी कॉल लेटर असावे. व टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस. बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणालीसाठी एस.एस.बी. कॉल लेटर असावे किंवा एस.एस.बी. साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे यापैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत आणावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# शेख अरहान मुकरम यांचे बॉक्सिंगमध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक

## 60 किलो वजन गटात शानदार कामगिरी; शेख मुकरम यांना सुपुत्राच्या यशाचा अभिमान

**छत्रपती संभाजीनगर :** कटकट गेट परिसरातील स्कॉलर इंग्लिश स्कूलच्या इयत्ता नववीतील विद्यार्थी शेख अरहान मुकरम यांनी जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत ६० किलो वजन गटात उत्कृष्ट व दमदार कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपद मिळविले आहे. अरहानच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा, कुटुंबीय आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन आमदार सुहास शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेतील विजेता शेख अरहान मुकरम यांना ऑल महाराष्ट्र वुशू असोसिएशनचे अध्यक्ष मुख्तार पटेल व सचिव सय्यद सद्दाम यांच्या हस्ते मेडल



आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

अरहानच्या या यशामागे त्याची कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि जिद्द यांचा मोठा वाटा असून, त्यांचे क्रीडा शिक्षक मुजीब सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. योग्य प्रशिक्षण आणि प्रोत्साहनामुळे अरहानने स्पर्धेत प्रभावी कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

यावेळी नगरसेवक इर्शाद हाजी, नासेर सिद्दीकी, शेख सलमान पहलवान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ज़हूर सय्यद, अजिंक्य नितनवारे, ज़ाहिद खान, अब्दुल हादी, अब्दुल मजीद, सय्यद जुबेर, सय्यद रिजवान, सय्यद अबुलाला तसेच स्पोर्ट्स टीम आणि आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

शेख अरहान मुकरम हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (प.)चे प्रदेश सहसचिव शेख मुकरम यांचे सुपुत्र आहेत. अरहानच्या या यशाबद्दल शाळा प्रशासन, कुटुंबीय, शिक्षक, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्याच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# 51 टक्के बौद्ध सदस्य असलेल्या पात्र संस्थांना तातडीने अनुदान द्या

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** राज्यातील ५१ टक्के बौद्ध सदस्य असलेल्या पात्र स्वयंसेवी संस्थांना शासनाने मंजूर केलेले अनुदान तातडीने वितरित करावे, अशी मागणी महाराष्ट्र एनजीओ महासंघटनच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) संगीता यशोदा गोविंद राठोड यांना देण्यात आले. निवेदन स्वीकारून त्यांनी त्यावर कार्यवाहीची नोंद केली.

या अनुषंगाने अल्पसंख्याक विभागामार्फत राज्यातील पात्र स्वयंसेवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते.




जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त प्रस्तावांची छाननी करून आवश्यक त्रुटींची पूर्तता करण्यात आली असून, पात्र संस्थांच्या प्रस्तावांची शासन स्तरावर शिफारस करण्यात आली आहे. पात्र संस्थांना दहा लाख रुपये अनुदान देण्याची तरतूद असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्वयंसेवी संस्था या समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत शासनाच्या विविध योजना व सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत आहेत. त्यामुळे पात्र संस्थांना अनुदानासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागू नये. शासनाने सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून पात्र संस्थांना तातडीने अनुदान वितरित करावे, अशी मागणी महासंघटनने केली आहे.

यावेळी महाराष्ट्र एनजीओ महासंघटनचे राज्य उपाध्यक्ष रामदास वाघमारे, राज्य सचिव नंदकिशोर हत्तीआंबिरे, प्रिती शेगोकार, अभिजीत हिवराळे तसेच महासंघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, शासनाकडून या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन पात्र स्वयंसेवी संस्थांना अनुदान वितरित करण्यात यावे. अन्यथा लोकशाही मार्गाने राज्यभर आंदोलन करण्याचा इशाराही महाराष्ट्र एनजीओ महासंघटनच्या वतीने देण्यात आला आहे.

# मुलीच्या वाढदिवशी माणुसकीचा 'शीत' स्पर्श




जिंतूर, दि. 27 (प्रतिनिधी) – वाढदिवसावरील अनाठायी खर्च टाळून पत्रकार रत्नदीप शेजावळे यांनी मुलगी नितीच्या वाढदिवसानिमित्त जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील चार महिन्यांपासून बंद असलेल्या शवपेटीच्या दुरुस्तीसाठी आर्थिक मदत करून सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले.

ग्रामीण रुग्णालयातील शवपेटी गॅसअभावी दीर्घकाळापासून बंद असल्याने मृतदेह सुरक्षित ठेवण्याची सुविधा बाधित झाली होती. या समस्येची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर पत्रकार शेजावळे यांनी वाढदिवसाचा खर्च कमी करून दुरुस्तीसाठी मदतीचा हात पुढे केला.

मुलगी निती हिच्या हस्ते डॉ. शेख अजीज, परिचारिका अर्चना जवळे, विनोद राठोड, गंगाधर पालवे व आरोग्यसेवक नागेश आकात यांच्या उपस्थितीत मदतीची रक्कम सुपूर्द करण्यात आली.

या उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याला सामाजिक जबाबदारीची जोड मिळाली असून, सार्वजनिक सुविधांसाठी योगदान देण्याचा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला आहे. शेजावळे यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# संरक्षण संशोधनाच्या रोमांचक कथांनी विद्यार्थ्यांना दिली राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा

## युवाभारत स्टुडंट फोरमच्या युवा संमेलनातून देशाच्या स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञानाची माहिती



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर – संगणक आणि मोबाईलच्या युगात रमलेल्या तरुणाईला देशाच्या संरक्षण संशोधनाची वाटचाल, त्यामागील वैज्ञानिकांचे योगदान आणि पडद्यामागील रोमांचक प्रसंगांची माहिती मिळावी, तसेच ज्ञानाला राष्ट्रसेवेची दिशा मिळावी, या उद्देशाने युवाभारत स्टुडंट फोरमतर्फे युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले. समर्थनगर येथील विवेकानंद महाविद्यालयात झालेल्या या संमेलनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वेळी संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) वरिष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी संरक्षण संशोधनातील विविध अनुभव, आव्हाने आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या निर्मितीमागील वैज्ञानिकांची मेहनत विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितली. त्यांच्या अनुभवकथनातून विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रातील संशोधनाची दिशा, त्यातील आव्हाने तसेच देशाच्या सुरक्षेसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्त्व समजले.

'ज्या राष्ट्राची सुरक्षा स्वतःच्या सामर्थ्यावर उभी असते, ते राष्ट्र खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर आणि सामर्थ्यवान बनते,' असे सांगत देवधर यांनी भारताने स्वदेशी संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बळावर संरक्षण क्षेत्रात केलेल्या प्रगतीवर प्रकाश टाकला. अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून स्वदेशी संरक्षण प्रणालींच्या निर्मितीपर्यंतचा भारताचा प्रवास हा आत्मनिर्भरतेच्या सामर्थ्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी काशिनाथ देवधर यांनी भारताचे महान शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबत केलेल्या कार्याच्या आठवणी विद्यार्थ्यांसमोर सांगितल्या. त्यांच्या अनुभवकथनातून डॉ. कलाम यांची संशोधननिष्ठा, राष्ट्रप्रेम आणि तरुणांप्रती असलेली आस्था विद्यार्थ्यांना अनुभवता आली.

हे संमेलन केवळ संरक्षण तंत्रज्ञानाची माहिती देणारे नव्हते, तर ज्ञान, धाडस, संशोधन, राष्ट्रनिष्ठा आणि आत्मनिर्भरतेची प्रेरणा देणारे ठरले. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःच्या यशाचा ध्यास न घेता राष्ट्रनिर्मितीत योगदान देणारे सक्षम नागरिक बनावे, असे आवाहन देवधर यांनी केले.

# टेरेसवर मध्यरात्री दोन पाळीव श्वानांची धारदार शस्त्राने हत्या; शेजारी राहणाऱ्या भाऊ-भावजयीवर संशय

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर
मधील सिटी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नारळीबाग परिसरात अत्यंत संतापजनक आणि क्रूर घटना उघडकीस आली आहे. घराच्या टेरेसवर बांधलेल्या दोन निष्पाप पाळीव श्वानांची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना बुधवारी (२६ ऑगस्ट) सकाळी समोर आली. घर खाली करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून शेजारीच राहणाऱ्या भाऊ आणि भावजयीनेच हा क्रूर प्रकार केल्याचा संशय फिर्यादी महिलेने व्यक्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी संबंधित संशयित दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी कौशल्याबाई गंगाधर लोखंडे (वय ६५, रा. आरती किराणा स्टोअरमागे, नारळीबाग) यांनी सिटी चौक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कौशल्याबाई या आपल्या पती, चार मुले आणि नातवासह तीन मजली इमारतीत राहतात. त्यांच्या घराच्या टेरेसवर त्यांनी 'रॉकी' (अडीच महिन्यांचा काळ्या-पांढऱ्या रंगाचा) आणि 'क्युटी' (साडेतीन महिन्यांची पांढऱ्या-भुरक्या रंगाची) असे दोन लहान पाळीव श्वान पाळले होते आणि त्यांच्या राहण्याची व्यवस्था तिथेच केली होती.

मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी (२५ ऑगस्ट) रात्री अकराच्या सुमारास कौशल्याबाई यांचे पती गंगाधर लोखंडे यांनी दोन्ही श्वानांना भाकरी खाऊ घातली आणि त्यांना टेरेसवर दोरीने सुरक्षित बांधले व ते खाली घरात निघून आले. त्यानंतर बुधवारी (२६ ऑगस्ट) सकाळी सात वाजता गंगाधर लोखंडे हे पुन्हा टेरेसवर गेले असता, त्यांना दोन्ही पाळीव श्वान रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळले. अज्ञात हल्लेखोराने किंवा संशयितांनी त्यांना धारदार शस्त्राने बेदम मारहाण करून ठार मारल्याचे स्पष्ट झाले.

याप्रकरणी कौशल्याबाई यांनी दिलेली माहिती आणि आधी दिलेल्या धमक्यांच्या आधारे आपला भाऊ श्यामराव आणि भावजय रुखमनबाई या दाम्पत्यावरच तीव्र संशय व्यक्त केला आहे. कौशल्याबाईंच्या फिर्यादीवरून सिटी चौक पोलिसांनी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या घटनेचा पुढील सखोल तपास पोलीस अंमलदार राजेश शिंदे करत आहेत. घरगुती वादातून मुक्या प्राण्यांवर काढलेल्या या क्रूर रोषामुळे परिसरात संताप व्यक्त होत आहे.

**पाळीव श्वानांच्या हत्येमागील नेमके कारण आणि वाद:** फिर्यादी कौशल्याबाई यांच्याच इमारतीमधील चार खोल्यांमध्ये त्यांचा भाऊ श्यामराव शनफडू शेलार व भावजय रुखमनबाई हे गेल्या सुमारे १५ वर्षांपासून विनामूल्य राहत आहेत. मात्र, अलीकडेच कौशल्याबाई यांनी आपल्या भाऊ आणि भावजयीला घर खाली करण्यास सांगितले होते. या कारणावरून त्यांच्यात सातत्याने वाद होत होते. "तुम्ही पाळलेले श्वान टेरेसवर घाण करतात, त्यांचा आम्हाला खूप त्रास होतो. या श्वानांना आम्ही एक ना एक दिवस मारून टाकू," अशी खुली धमकी या दाम्पत्याने दिली होती, असे गेल्या २३ ऑगस्टला सकाळी १० वाजता अन्य भाडेकरूंनी कौशल्याबाईंना सांगितले होते.

# समरसता साहित्य परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समरसता साहित्य परिषद, देवगिरी प्रांताच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा तसेच नवनियुक्त कार्यकारिणीची पहिली बैठक उत्साहात पार पडली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला.



कार्यक्रमास समरसता साहित्य परिषदेचे महाराष्ट्र राज्य कार्यवाह डॉ. प्रसन्न पाटील, देवगिरी प्रांत कार्यकारिणीच्या सदस्य मृणालताई देशपांडे व सतीश डिवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देताना साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समरसता, वैचारिक प्रबोधन आणि समाजातील विविध घटकांना जोडण्याच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्याचे आवाहन करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी नागनाथ काजळे, उपाध्यक्षपदी प्रा. ज्ञानेश्वर कुळकर्णी, कार्यवाह तथा सचिवपदी गिरीश जोशी, सहकार्यवाह तथा सहसचिवपदी अर्चना देवधर आणि कोषाध्यक्षपदी संजय बाजी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून अंजली दीक्षित, रुपाली पाटील, दीपक हापत, प्रा. निलेश कड, सांगिता चव्हाण आणि हनुमंत कमले, तर सदस्य म्हणून अजय त्रिभुवन यांची नियुक्ती करण्यात आली.

पदग्रहणानंतर झालेल्या पहिल्या बैठकीत जिल्ह्यात विविध साहित्यिक उपक्रम, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, साहित्यिकांच्या सहभागातून वैचारिक प्रबोधन तसेच समरसतेचा विचार समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविण्याबाबत चर्चा

# महाराष्ट्र हिंदी विद्यालयात पर्यावरणपूरक राखी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

आगामी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविणे आणि नैसर्गिक व पुनर्वापरयोग्य साहित्याचा सर्जनशील वापर करण्यास प्रोत्साहन देणे या उद्देशाफरून शहरात एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्या वर्धक समिती संचालित शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालय आणि मराठवाडा अध्यापक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच उत्साही वातावरणात 'पर्यावरणपूरक राखी कार्यशाळा' संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत अत्यंत आकर्षक आणि कलात्मक राख्या साकारल्या.

कार्यशाळेच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक साहित्याचे महत्त्व, त्याचा योग्य वापर तसेच प्लास्टिकमुक्त व प्रदूषणमुक्त पद्धतीने सण साजरा करण्याच्या गरजेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थी शिक्षकांनी राखी निर्मितीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्याचे नियोजनबद्ध वाटप केले. कागद, बिया, विविध रंगांच्या डाळी, तांदूळ, सुती धागे आणि अन्य नैसर्गिक साहित्याचा कल्पक वापर करीत विद्यार्थ्यांनी सुंदर व पर्यावरणस्नेही राख्या तयार केल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना 'स्वनिर्मिती'चा आनंद अनुभवण्याची अनोखी संधी मिळाली.

या उपक्रमास मराठवाडा अध्यापक महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. शेख शकील माजिद आणि डॉ. शेख सारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक रवींद्र तायडे, पर्यवेक्षक योगेश्वर निकम, उपक्रमशील शिक्षक संदीप भदाणे, सोनाली देसले, सविता नागकीर्ती तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद यांच्या प्रमुख उपस्थितीने व मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांचा उत्साह अधिकच दुणावला. शैक्षणिक उपक्रमासोबतच या कार्यशाळेला नेतृत्व, नियोजन आणि सामाजिक बांधिलकीचीही सुंदर जोड मिळाली होती.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी शिक्षक मुसद्दिक शेख, मुजाहिद शेख, रेणुका वांजुळे, सौरभ गुल्हाने, जिशान शेख, तेहरिम सय्यद, निशाद शेख, आवेज शेख आणि छाया पानसरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कल्पक उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे, उपाध्यक्ष प्रा. सुरेश पुरी, सचिव डॉ. नारायण वाकळे यांच्यासह मुख्याध्यापक रवींद्र तायडे, किरण पवार, पर्यवेक्षक योगेश्वर निकम, कैलास गौतम, वाल्मीक चव्हाण आदीमान्यवरांनी सर्व विद्यार्थी शिक्षकांचे अभिनंदन केले. सण, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर समन्वय साधणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व सर्जनशीलतेला चालना देणारा ठरल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे पालक वर्गासह सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# उरण तालुका बौद्धधम्म संघटनेच्या अध्यक्षपदी संजय गायकवाड

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड - उरण तालुक्यातील बौद्ध धर्मातील नागरिकांच्या सामाजिक प्रश्नांचे निवारण करण्याबरोबरच धार्मिक व शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी उरण तालुक्यातील बौद्ध समाजातील नेते, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना एकत्रित करून उरण तालुका बौद्धधम्म संघटनेची स्थापना करण्यात आली आहे.

या संघटनेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार संजय गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी दिनेश गायकवाड, सुनील गायकवाड,परशुराम शिवशरण,एन.बी.कुरणे,सुनील जाधव आणि शैलेश तांमगाडगे, कार्याध्यक्षपदी ॲड. निलेश मर्चंड, सहकार्याध्यक्षपदी डॉ. निशा ओव्हाळ, सरचिटणीसपदी सुनील जोशी, सहसरचिटणीसपदी आम्रपाली गायकवाड, खजिनदारपदी सदानंद गायकवाड , सहखजिनदारपदी जोती सकपाळ मॅडम, सल्लागारपदी ॲड. श्रीधर कवडे व विनायक नगावरे, प्रसिद्धीप्रमुखपदी सुयोग गायकवाड यांची निवड करण्यात आली.

यावेळी सदस्य तुकाराम खंडागळे, गणेश कांबळे (जासई), प्रकाश कांबळे (जासई), कांचन ओव्हाळ, मनोज ओव्हाळ, प्रमोद कांबळे, संतोष मोघे, शांताबाई परुळेकर, अर्चना परुळेकर, नवनीत कांबळे, आदित्य मर्चंडे, दीपक साळुंके, अरुण ओव्हाळ, ऋषिकेश कासारे, सिद्धार्थ कांबळे, सुरेंद्र नवधरे, आदित्य गायकवाड, मंगेश कांबळे, विशाल कवडे, विनायक नानावले, लखन गायकवाड, प्रकाश शरणागत, प्रकाश गायकवाड, सचिन धुळे, संतोष गायकवाड, दिपक साबळे, समर्थ कांबळे, महेश, निखिल, समीर गायकवाड, आदी सदस्य उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय! मौलाना मोहम्मद अली जोहर शिक्षण संस्थेच्या भरती प्रक्रियेवरील आदेश कायम



**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर (जि. छत्रपती संभाजीनगर येथील मौलाना मोहम्मद अली जौहर एज्युकेशन सोसायटी आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख मोहम्मद कैसर आझाद यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका Special Leave Petition SLP अखेर फेटाळून लावण्यात आली आहे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे मुंबई उच्च न्यायालयाचा भरती प्रक्रियेबाबतचा आदेश कायम राहिला असून संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांना मोठा दिलासा मिळाला आहे

कायदेशीर लढाई आणि न्यायालयाचे निरीक्षण पठाण बनेखा नूरखा यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २ जुलै २०२६ रोजी रिट याचिका क्र. ८४३१/२०२४ व ८४४६/२०२४ मध्ये दिलेल्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती २२ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची अंतिम सुनावणी पार पडली

न्यायालयाने उपलब्ध सर्व कागदपत्रे आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाची सखोल पाहणी केल्यानंतर नमूद केले की उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करावा अशी कोणतीही कायदेशीर त्रुटी आढळलेली नाही असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने ही विशेष अनुमती याचिका फेटाळून लावली. शासन निर्णयाबाबत G.R. युक्तिवाद अमान्य सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या एक दिवस आधी जारी झालेल्या नवीन शासन निर्णयाचा G.R. हवाला देत भविष्यातील भरती प्रक्रिया उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राबवू नये अशी विनंती न्यायालयाला केली.

# निजामशाहीकालीन वारशाची ऐतिहासिक सफर; छत्रपती संभाजीनगरमध्ये रविवारी 'महमूदपुरा हेरिटेज वॉक'चे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

मध्ययुगीन काळात दख्खनमध्ये बलाढ्य फौजांना आपल्या कर्तृत्वाने यशस्वीपणे थोपवणारे आणि ऐतिहासिक नहरींद्वारे जुन्या खडकीचे एका सुनियोजित शहरात रूपांतर करणारे निजामशाहीचे पराक्रमी वजीर मलिक अंबर यांच्या समृद्ध वारशाची नागरिकांना ओळख करून देण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि इन्टाच (IN-TACH) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या संयुक्त विद्यमाने आगामी रविवारी, म्हणजेच ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत 'महमूदपुरा हेरिटेज वॉक' आयोजित करण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या पर्यटन विभागाच्या वतीने शहरातील ऐतिहासिक ठिकाणांची महती जनमानसात रुजवण्यासाठी याआधीही विविध यशस्वी उपक्रम राबवले गेले आहेत. यंदाही या ऐतिहासिक मोहिमेला नागर इतिहासप्रेमी आणि विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. महापालिकेच्या या महत्त्वकांक्षी उपक्रमामुळे शहराच्या वैभवशाली इतिहासाचे विविध पैलू पुन्हा एकदा प्रकाशझोतात येत आहेत.

या आगामी हेरिटेज वॉकची प्रत्यक्ष सुरुवात ताज हॉटेलसमोरील नहर-ए-अंबरी गोमुख येथून होणार असून, वानखेडेनगरमधील प्रसिद्ध श्री निळकंठेश्वर महादेव मंदिराच्या परिसरात या ऐतिहासिक सफरीची सांगता होईल. या दोन तासांच्या प्रवासात सहभागी नागरिकांना महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक वास्तू, तिथली खास स्थापत्यशैली, प्राचीन जलव्यवस्था आणि निजामशाहीकालीन समृद्ध संस्कृतीचा अत्यंत जवळून परिचय घडवला जाणार आहे.

या हेरिटेज वॉकदरम्यान महमूदपुरा परिसरातील ऐतिहासिक मकबरा, नहर-ए-अंबरीचा अमूल्य वारसा तसेच श्री निळकंठेश्वर महादेव मंदिरातील विलोभनीय राजपूत छत्री शैलीतील बारादरी ही या संपूर्ण सफरीची प्रमुख आकर्षणे असणार आहेत. या प्राचीन वास्तू केवळ वास्तुकलेचे उत्तम नमुने नसून त्यामागील तत्कालीन नगररचना, सामाजिक जीवन आणि उत्तम जलव्यवस्थापनाची अचूक माहिती या माध्यमातून उपस्थितांना अनुभवता येणार आहे.

शहराचा हा ऐतिहासिक वारसा केवळ दगड-विटांच्या वास्तुरचनेपुरता मर्यादित नसून तो शहराच्या जडणघडणीचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे इतिहासप्रेमी, संशोधक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी आपल्या शहराच्या या थोर ऐतिहासिक वारशाची जवळून ओळख करून घेण्यासाठी या हेरिटेज वॉकमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक सहायक आयुक्त ऋतुजा पाटील तसेच इन्टाचचे मार्गदर्शक संकेत कुलकर्णी आणि आदित्य वाघमारे यांनी केले आहे.

# महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाचा दिलदारपणा! नितांत सुंदर व्हिएतनामचे 35 जणांना घडवले पर्यटन!

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांचे अनोखे दातृत्व सर्वपरिचित आहे. दुसऱ्यांची स्वप्नं पूर्ण करण्याचा जणू त्यांनी विडाच उचलला आहे. ज्यांनी केवळ विमान हा शब्द ऐकला आहे, अशा अनेकांना त्यांनी आजपर्यंत विमान प्रवास घडवला आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाच्या दिलदारपणामुळेच हायस्कूल आणि महाविद्यालयीन जीवनात लाभलेल्या सवंगड्यांसह त्यांनी चक्क ३५ जणांना १७ ते २५ ऑगस्ट असे आठ दिवस नितांतसुंदर अशा व्हिएतनामचे पर्यटन घडवले. परदेश प्रवास स्वप्नातही न पाहिलेल्यांना महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनामची सफर घडवली. त्यांचे परदेश प्रवासाचे स्वप्न पूर्ण केले. त्यामुळे चाकोरीबद्ध आयुष्य जगलेल्या सवंगड्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

ज्यांनी पासपोर्ट शब्द ऐकला होता, पण पासपोर्ट काढला नव्हता, त्यांनीही आठ दिवसांच्या पर्यटनात व्हिएतनामची राजधानी हनोई, त्यानंतर दा नांग, बाणा हिल, फु कॉक, हो ची मिन्ह शहर आणि मुंबई असा पाच वेळा विमान प्रवास केला आणि फाईव्हस्टार आणि थ्री स्टार हॉटेलमध्ये व्हिएतनाममध्ये राहाण्याची संधी दिली. त्यामुळे अशा सहकाऱ्यांना आकाश ठेंगणे झाले होते. क्रूझ सफर, तेथे जागोजागी असणारी बेटे, बाणा हिल येथे केबल कारमधून प्रवास आणि ते विहंगम दृश्य, दोन्ही हातावर साकारलेला पूल, तेथील उंचच उंच डोंगर रांगांतून जाणारी केबल कार, अनेक बेटांना जोडणारी जगातील सर्वाधिक लांबीची केबल कार, दा ची मिन्ह हे सुसज्ज शहर आणि व्हिएतनाम-अमेरिकादरम्यानच्या युद्धाची अंगावर काटा आणणारी दृश्य असणारे संग्रहालय आदींचे दर्शन एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना महेंद्रशेठ घरत यांनी घडवले. त्यामुळे एम. जी. ग्रुपचे सहकारी भारावले आहेत.



यावेळी एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना भावना अनावर झाल्या होत्या. महेंद्रशेठ घरत यांच्यामुळेच आम्ही पहिल्यांदा विमानात बसलो. एवढेच नव्हे तर परदेशात जाऊ शकलो. त्यांनी प्रवासात जो आनंद दिला त्याला तोड नाही. त्यांनी स्वतःपेक्षा आमचीच काळजी व्हिएतनाम प्रवासात घेतली. उत्तम नियोजन आणि शिस्तप्रिय व्यवस्थापनाने प्रवासाचा आनंद द्विगुणित केला, अशा भावना पहिल्यांदाच परदेश प्रवास केलेल्या सवगंड्यांनी व्यक्त केल्या. परदेशात ३५ जणांना सांभाळणे आणि सांभाळून घेणे सोपे काम नव्हते, पण महेंद्रशेठ घरत यांनी ते लीलया पार पाडले. विशेष म्हणजे व्हिएतनाम पर्यटनासाठी असलेल्या सहकाऱ्यांच्या काही नातेवाईकांचे निधन झाले, काहींच्या घरी अडीअडचणी निर्माण झाल्या. कुणी गंभीर आजारी पडले, मात्र व्हिएतनाम प्रवासात महेंद्रशेठ घरत यांनी ज्यांच्या कुटुंबात दुःखद घटना घडली आहे, त्यांना मोलाचा आधार दिला. श्रद्धांजली वाहिली. तसेच गंभीर आजारी असणाऱ्यांवर व्यवस्थित आणि वेळेवर उपचार होतील, याची काळजी महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनाममधूनही घेतली. त्यामुळे मोठ्या मनाचा, दिलदार आणि दुसऱ्याला आनंद देण्याची वृत्ती, समोरच्याच्या चेहऱ्यावरील भावना वाचणारे महेंद्रशेठ घरत, हे सद्यपरिस्थितीत एकमेव नेते असल्याच्या भावनाही व्हिएतनाम पर्यटनातील सवंगड्यांनी व्यक्त केल्या.

# शहरात जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद; उद्योग वाढीसाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - शहरातील उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढावी आणि व्यावसायिक व गुंतवणूकदारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून मिळावे, यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही महत्त्वाची परिषद येत्या शनिवारी (दि. २९) सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे पार पडणार आहे.

या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२६ च्या अध्यक्षस्थानी राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट हे असणार आहेत. तसेच, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत आणि जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांची या परिषदेला प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. आपल्या जिल्ह्यात ऑटोमोबाईल, इंजिनिअरींग उद्योग, कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग तसेच ऐतिहासिक हिमरु शाल आणि वस्त्रोद्योगाची महत्त्वाची केंद्रे आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक उत्पादनांसाठी नवी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, निर्यातदारांसाठी विशेष सुविधांची निर्मिती करणे आणि नवीन उद्योग व मोठी गुंतवणूक शहरात आकर्षित करणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी परिषदेदरम्यान विविध विषयांवर सखोल चर्चा, विचारविनिमय तसेच महत्त्वाचे सामंजस्य करार देखील केले जाणार आहेत. जिल्ह्यातील सर्व उद्योजक, उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी, शेती उत्पादक संस्था आणि नवउद्योजकांनी या महत्त्वपूर्ण परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राच्या उपायुक्त श्रीमती करुणा खरात यांनी केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911